**सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेच्या १४,८३८ घरांच्या सोडतीकरीता वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न व त्यांची उत्तरे खालीलप्रमाणे :**

१. **कागदपत्रांची पुर्तता कधी व कुठे करावयाची ?**
याबाबतची माहिती सिडको संकेतस्थळ www.lottery.cidcoindia.com वर प्रसिध्द करण्यात येईल.

२. **माझा संपर्क क्रमांक किंवा पत्ता बदलला असल्यास काय करावे?**
सर्व पत्रव्यवहार नोंदणी केलेल्या पत्यावर व संपर्क क्रमांवरच करण्यात येतील. अर्जदारांनी पत्रव्यवहार मिळण्याची सोय स्वत: करावी.

३. **सोडती संदर्भात माहितीकरीता संपर्क कुठे करावा किंवा Website कोणती ?**
संपर्काकरीता पत्ता : व्यवस्थापक पणन-२, तिसरा मजला, रायगड भवन
Website : www.cidco.maharashtra.gov.in व
http//lottery.cidcoindia.com

४. **अपात्र व प्रतिक्षा यादीतील अर्जदारांना पैसे कधी मिळणार?**
येत्या १५ दिवसांत. अर्जदारांनी दिलेल्या खात्यावर पैसे जमा करण्यात येतील.

५. **मला गृहकर्ज कसे मिळणार ?**
सदरची जबाबदारी सर्वस्वी अर्जदाराची असून, अर्जदारांनी बँकांकडे संपर्क साधावा

६. **दोन पेक्षा जास्त सदनिका सोडतीमध्ये यशस्वी झाली असल्यास काय करावे?**
यशस्वी अर्जदारांने एक सदनिका ठेवून, उर्वरित सदनिकांचे रद्द करणेबाबतचे पत्र व्यवस्थापक पणन-२ विभाग, तिसरा मजला, रायागड भवन येथे सादर करावे.

**७. सदनिकेची किमंत किती असणार?**

सदरची माहिती, माहितीपुस्तिकेत देण्यात आली आहे. माहितीपुस्तिका सिडकोच्या वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**८. मला वाटपपत्र कधी देण्यात येईल?**

कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर छाननी समितीने अर्जदारास पात्र ठरविल्यानंतर वाटपपत्र देण्यात येईल.

**९. इरादापत्र देण्यात येईल का? केव्हा ?**

होय, साधारणत: एक महिन्यात

**१०. प्रधानमंत्री आवास योजना मध्ये नोंदणी करणे गरजेचे आहे काय?**

आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील अर्जदारांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

**११. कागदपत्रे सादर करावयाचे नमुने कुठे मिळतील?**

कागदपत्रांचे नमुने वरील संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले आहेत.

**१२. आवश्यक असणारे कागदपत्रे कोणती ?**

माहिती पुस्तिकेच्या पृष्ठ क्र. १४ व १५ वर उल्लेख केलेली आहेत व याबाबतची चेकलिस्ट संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**१३. जात वैधता प्रमाणपत्र कसे मिळेल?**

सदरची जबाबदारी अर्जदारांची आहे, त्यानी संबंधित कार्यालयात चौकशी करावी.

**१४. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) गरजेचे आहे काय?**

होय

**१५. प्रतिक्षा यादीमधील अर्जदारांना सदनिका कधी मिळतील?**

पात्र झालेल्या अर्जदारांचे घरे काही कारणास्तव रद्द झाले तरच, प्रतिक्षा यादीतील अर्जदारांना प्राधान्य क्रमानुसार कागदपत्रांची पुर्तता करणेकरीता बोलविण्यात येईल व तसे पत्र पाठविण्यात येईल.

**१६. सदनिकेची रक्कम भरण्यास किती कालावधी देण्यात येईल?**

वाटपपत्र (allotment letter) मधील अनामत रक्कम ठेव वगळता सदनिकेच्या विक्री मुल्याची रक्कम सदनिकाधारकांकडून ६ (सहा) समान हप्त्यामध्ये स्विकारण्यात येईल. हप्ता भरणाच्या तारखा वाटपपत्रात नमूद करण्यात येतील.

**: साधनतेचा इशारा :**

**सिडको महामंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी / सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला सिडको जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा सिडकोच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इत्यादी बाबी करताना आढळल्यास सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकारी व व्यवस्थापक (पणन-२) यांचे कार्यालयास कळवावे.**

त्यांचे दूरध्वीनी क्र. पुढीलप्रमाणे आहेत.
मुख्य दक्षता अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक : ०२२-६७९१८२८९
व्यवस्थापक (पणन-२) दूरध्वनी क्रमांक : ०२२-६७१२११७८